**प्रेसनोट** दि. १/०७/२०२५

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून दुय्यम निबंधक कार्यालय, हवेली - १ या कार्यालयातील अधिका-यांकरीता लाच मागणा-या व लाच स्विकारणा-या खाजगी महिलेवर कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ४५ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | श्रीमती. अनिता विनोद रणपिसे, वय ५४ वर्ष, रा. जेजुरी जकात नाका, नारायणपुर रोड, सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे. (खाजगी रायटर – दुय्यम निबंधक कार्यालय, हवेली १ कार्यालयाचे बाहेरील आवारात) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ६,०००/- (सहा हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी रक्कम | ६,०००/- (सहा हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- (पाच हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | २७/०६/२०२५ व दि. ३०/०६/२०२५ |
| सापळा दिनांक | ०१/०७/२०२५ |
| ठिकाण | तहसिल कार्यालय, हवेली चे समोरील डावे बाजुस असलेल्या मोकळ्या जागेत, पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती. भारती मोरे, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९८७०१५६५८६) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे त्यांचे घर तारण ठेवून त्यावर कर्ज काढणार आहेत. ते कर्ज काढण्यासाठी बँकेत दिलेल्या अर्जासोबत त्यांना त्यांच्या सन १९८७ मधील घराची खरेदीखताची प्रत आवश्यक असल्याने ती प्रत मिळण्यासाठी त्यांनी दुय्यम निबधक कार्यालय, हवेली १, खडकमाळ, पुणे येथे अर्ज केला होता. श्रीमती. अनिता विनोद रणपिसे या दुय्यम निबंधक कार्यालय हवेली - १, खडकमाळ या कार्यालयाचे बाहेरील आवारात खाजगी रायटर म्हणून काम करतात. तक्रारदार हे त्यांना आवश्यक असलेल्या खरेदीखताची प्रत मिळण्यासाठी संबंधित कार्यालयात अर्ज घेऊन गेले असता तेथे हजर असलेले खाजगी इसम श्रीमती अनिता रणपिसे यांनी खरेदीखताची प्रत काढून देण्यासाठी तक्रारदाराकडे कार्यालयातील अधिका-यांसाठी ५००० रुपय आणि स्वतःसाठी १००० असे एकूण ६००० रुपयाची लाच मागितल्याची तक्रार तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे दि. २६/०६/२५ रोजी दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. २७/६/२०२५ व दि. ३०/६/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, खाजगी इसम श्रीमती अनिता रणपिसे, खाजगी रायटर यांनी तक्रारदार यांना आवश्यक असलेली खरेदी खताची प्रत काढून देण्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिका-यांसाठी ५,००० रुपये व स्वत:साठी १,००० रुपयाची लाच रकमेची मागणी करुन, त्यापैकी ॲडव्हान्स म्हणुन ३००० रुपये द्या व काम झाल्यावर बाकीचे द्या असे म्हणून लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आज दि. १/७/२०२५ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये, खाजगी इसम श्रीमती अनिता रणपिसे, खाजगी रायटर यांनी तक्रारदाराकडून त्यांना आवश्यक असलेल्या खरेदीखताची प्रत देण्यासाठी ६००० रुपयाची लाच रक्कम स्विकारुन, त्यातील १००० रुपये तक्रारदारास पुन्हा दिले. खाजगी इसम श्रीमती अनिता रणपिसे यांनी तक्राराकडून लाच रक्कम स्वीकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

१/७/२५

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक
सत्यमेव जयते
ॲन्टी करप्शन ब्युरो